काश्मीर दौऱ्यावरील शिष्टमंडळाचे सदस्य राजू शेट्टी यांचा खास लेख

पीपल्स पॉलिटिक्स
ऑक्टोबर २०१० | १५ रुपये



# साखर
## उत्पादकांची की ग्राहकांची?

राहूलजी; गर्दीतल्या चेहऱ्यातील दरी शोधा! एक अनावृत्त पत्र

प्रकाश आंबेडकर यांची मुलाखत

भवरलाल जैन यांच्या जन्मगावची यशकथा

भुजबळ साहबको गुस्सा क्यूं आता है..

पुढील अंक... दिवाळी विशेषांक

पीपल्स पॉलिटिक्स
संवाद प्रकाशनचे मासिक
किंमत १५ रुपये

RNI TC NO. MAHMAR 37208
DCI/DESK-6/MAG/DLR/SR/2437/10


# अनुक्रमणिका


वर्ष : १, अंक : ४
**ऑक्टोबर २०१०**

संपादक
**वसंत भोसले**
९९२२९०४००४

सहाय्यक संपादक
**गोपाळ पाटील**
९९२२९५९०९५

विशेष प्रतिनिधी
**धर्मेंद्र पवार (मुंबई)**
९२२५८२८६०२
**प्रशांत खुंटे (पुणे)**
९७६४४३२३२८
**उदय कुलकर्णी (कोल्हापूर)**
९४२२०४४६८८
**अनिल पाटील (गोवा)**
९४२२०४२०५४

मुखपृष्ठ/मांडणी
**ऑफबीट कन्सेप्टस्, पुणे**
९८८१०९८०१०

पत्रव्यवहाराचा पत्ता :
**संपादक, पीपल्स पॉलिटिक्स, आरोहन, घनश्यामनगर, माधवनगर रोड, सांगली. ४१६ ४१६**
**फोन : ०२३३-२३११६४४**
editorpolitics@gmail.com

हे मासिक संवाद प्रकाशनसाठी श्री. वसंत अप्पासाहेब भोसले यांनी मे. कुमार प्रिंटर्स, वसंतदादा औद्योगिक वसाहत, सांगली येथे मुद्रित करून, आरोहन, घनश्यामनगर, माधवनगर रोड, सांगली येथे प्रकाशित केले.




या मासिकातील कोणताही लेख अथवा मजकूर पूर्वपरवानगीशिवाय प्रसिद्ध करू नये.



**वार्षिक वर्गणी**
**२०० रुपये**
(दिवाळी अंकासह)

वर्गणीसाठी 'संवाद प्रकाशन' या नावाने चेक अथवा डी.डी काढावेत. सांगली शहराबाहेरील वर्गणीदारांनी चेकच्या वटणावळीसाठी जादा ३० रुपये पाठवावेत.


**कव्हरस्टोरी**
**साखर उत्पादकांची की ग्राहकांची?**
वसंत भोसले
पान ६

**साखरेचे अर्थकारण**
पी. जी. मेढे
पान ८

**ग्राहकांची पाठराखण ऊसउत्पादकांच्या मुळावर!**
अजित नरदे
पान १२





**काश्मीर आपलं, काश्मिरी आपले; त्यांना विश्वास द्यायला हवा...**
खासदार राजू शेट्टी............पान २०

**राहूलजी; गर्दीतल्या चेहऱ्यातील दरी शोधा!**
एक अनावृत्त पत्र
पान २२






**तुम्ही तुमच्या कॉजसाठी प्रामाणिक आहात का? - प्रकाश आंबेडकर**
प्रशात खुंटे
पान २४





**भवरलाल जैन यांच्या जन्मगावची यशकथा**
दिलीप तिवारी
पान ३८

अक्षरी अध्यक्ष?.......................................वैजनाथ महाजन १४
सरकार स्थापण्याची 'जादू' कोणाची? ..............उज्ज्वल त्रिपाठी १६
जंगलाचे कोळसे करण्याचा उद्योग ..................सचिन रोहेकर २६
राष्ट्रकुल स्पर्धा ते ओबामा दौरा .......................अलोक तिवारी २९
गोव्याला राजकीय अस्थिरतेचे ग्रहण! ................अनिल पाटील ३०
खंडेरावाचा काळी-पांढरीचा झगडा .................यमाजी मालकर ३६
भुजबळ साहबको गुस्सा क्यूं आता है.................बंधुराज लोणे ४४
कोल्हापूरची रणधुमाळी ...............................शैलेश पाटील ४६
राणे विरुद्ध केसरकर ..................................अभिमन्यू खेडेकर ४८
नेत्यांतील सुंदोपसुंदीचा विकासावर परिणाम .........गोपाळ पाटील ५०
विदर्भ अवैध वाहतुकीच्या विळख्यात ...............अविनाश पाठक ५२
थोड्याशा शुद्ध पाण्याची थोडीशी गोष्ट! .............उदय कुलकर्णी ५५
अचूक जनगणनेचा ब्राझील पॅटर्न ....................राम लाहिरी ५९
ऑस्ट्रेलियात आघाडी पर्व ............................ईश्वर माने ६१
इराकमधील सैन्य माघार : किती खरी; किती खोटी?....राम लाहिरी ६३
सगळी थापेबाजीच! ....................................प्रमोद मुजुमदार ६५



# भवरलाल जैन यांच्या जन्मगावची यशकथा

**वाकोद (ता. जामनेर, जि. जळगाव) हे अवघ्या साडेपाच हजार लोकवस्तीचे गाव. जळगावच्या जागतिकस्तरावरील जैन उद्योगसमूहाचे संस्थापक अध्यक्ष भवरलाल जैन यांचे जन्मगाव. आयुष्याच्या अर्धदशकात स्वत:च्या उद्योगविकासात देदीप्यमान यश मिळविल्यानंतर श्री. जैन यांनी आपल्या जन्मभूमीच्या विकासाचे स्वप्न पाहिले. सहा वर्षांपासून त्यांच्या त्याच्याच पूर्तीचा ध्यास त्यांनी घेतला. त्यांना ग्रामस्थांचेही सहकार्य लाभत आहे. राजकारणाच्या पलीकडची ही आगळी यशकथा...**

माणसं स्वत:च्या उद्योग-व्यापारात खूप मोठी होतात. त्यांचे कर्तृत्व इतरांसाठी हिमालयाप्रमाणे असते. यांपैकी अनेक जण गावातून येतात. बालपण गावात घालवतात. तेथे हिंडतात, बागडतात; मात्र नंतर स्वत:च्या व्यापात जन्मगावाचे अस्तित्व अनेक जण विसरून जातात. तेथील माणसांना ओळखण्याचा प्रश्नच नसतो.

प्लास्टिक पाईप आणि ठिबक सिंचन क्षेत्रात जगातील सर्वांत अग्रेसर कंपनी असलेल्या जैन उद्योगसमूहाचे संस्थापक अध्यक्ष भवरलाल जैन यांचे जन्मगाव वाकोद. जळगावपासून अवघ्या २० किलोमीटरवर. सध्या तेथील लोकवस्ती अवघी साडेपाच हजार असेल. या जन्मगावाचे ऋण फेडण्याचा प्रयत्न सध्या मोठे भाऊ ऊर्फ भवरलाल जैन करीत आहेत. श्री. जैन यांना सर्व जण मोठे भाऊ म्हणूनच ओळखतात. मोठे भाऊसुद्धा गावातील प्रत्येक व्यक्तीला नावाने ओळखतात. त्यांचे वेगळेपण आहे; ते याच ठिकाणी. गावाच्या मातीत जन्म घेऊन जगाच्या मातीवर वर्चस्व गाजवणाऱ्या मोठ्या भाऊंचे हे कार्यकर्तृत्व इतरांच्या पेक्षा वेगळे.

वाकोद ग्रामपंचायतीची निवडणूक ऑगस्ट २०१० मध्ये झाली. निवडणूक बिनविरोध करून महिलांच्या हाती गावाची सत्ता सोपविण्याचा मोठ्या भाऊंचा प्रयत्न होता. यासाठी १७ ऑगस्टला ग्रामसभा घेण्यात

## भवरलाल जैन यांच्या नेतृत्वाखालील जैन चॅरिटीज्च्या माध्यमातून वाकोदमध्ये २००४ पासून केलेली विकासकामे

आतापर्यंत ३ कोटी २२ लाख ३० हजार ७७३ रुपयांची कामे पूर्ण

जैन चॅरिटीज्चा हिस्सा
२ कोटी २२ लाख ३० हजार ७७३ रुपये

त्यांपैकी लोकवर्गणीतून ३ लाख ६१ हजार २८८ रुपये.

शासकीय निधी ९४ लाख ४९ हजार ४०० रुपये.

### विकासकामे

(कंसात जैन चॅरिटीज्चा हिस्सा)

बाजारासाठी व्यापारी ओटे, सौरपथदिवे, समाजमंदिर, रस्ते, गटारी, शौचालय बांधकाम : १ कोटी ५८ लाख ५९ हजार ९६७ रुपये (१ कोटी १० लाख ९९ हजार ६४६ रुपये)


माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळा विकास
४६ लाख ४९ हजार २४१ रुपये
(४४ लाख ८१ हजार २४१ रुपये)

शेती व शेतकऱ्यांच्या विकास
१० लाख ६३ हजार २३५ रुपये (सर्व)

प्राथमिक आरोग्य केंद्राची उभारणी
४४ लाख ५८ हजार ९५१ रुपये.
(७ लाख ३७२ रुपये)



वोकोदमधील गटारी



वोकोदमधील पाण्याची टाकी



वोकोदमधील बाजार ओटे



जिल्हा परिषदेची शाळा

आली. सरपंचपद महिलेसाठी राखीव असल्यामुळे ग्रामस्थांनी १५ च्या १५ जागांवर महिलांना बिनविरोध निवडून द्यावे, असा प्रस्ताव मोठ्या भाऊंनी ग्रामसभेत मांडला. १५ जागांसाठी ३३ नावे समोर आली. नंतर ग्रामस्थांनी एकोप्याने १८ नावे मागे घेतली. निवडणूक बिनविरोध होणार असे वाटत असताना गावातील काही मंडळींनी शब्द फिरवला आणि निवडणूक झाली; तरीसुद्धा ग्रामस्थांनी ९ महिलांना बहुमत दिले. काहीअंशी का असेना मोठ्या भाऊंची महिला राजची संकल्पना पूर्ण झाली.

हा सारा किस्सा सांगण्याचे कारण एवढेच, की मोठे भाऊ हे जागतिकस्तरावरील उद्योगसमूहाचे संस्थापक असले; तरी गेल्या सहा वर्षांपासून त्यांनी वाकोदच्या विकासात लक्ष घातले आहे. माझ्या जन्मगावाचा विकास योग्य लोकांच्या सहकार्याने मी करेन. गावाचा निधी दहा टक्के असेल; तर माझा ९० टक्के सहभाग असेल, हेच सूत्र अंगीकारून त्यांनी वाकोदचा चेहरामोहरा बदलण्याचा चंग बांधला आहे.

मोठ्या भाऊंनी वाकोदच्या विकासाचा विचार पहिल्यांदा जाहीरपणे ५ सप्टेंबर १९९३ रोजी बोलून दाखविला. अर्थात, त्या नंतर त्यांना अपेक्षित साथ होती; ती ग्रामस्थांची. कोणत्याही गावात राजकारणाचे अनेक गट असतात. त्यांचेही छोटे राजकारण असते. आमच्या गावात उद्योगपतींचे काय काम? आता गाव कसे चालवायचे आम्हाला हे शिकवतील का? या मागे यांचाच स्वार्थ असेल? अशा अनेक शंका-कुशंका ग्रामस्थांच्या मनांत निर्माण झाल्या. या लोकांचे मतपरिवर्तन करण्यात काही काळ जावा लागला. माणसं मनानं आणि विश्वासानं जोडावी लागली.

आपल्या जन्मगावाचा विकास करायचा; तर पदरचे काही पैसे खर्च करावे लागतील, अशी मानसिकता स्वत: मोठ्या भाऊंना तयार करावी लागली. या कल्पनेला मूर्तस्वरूप आले ते वाकोद येथे समाजमंदिराच्या उभारणीतून. कल्पनेला आकार आला तो राम मंदिराच्या जीर्णोद्धारातून. त्या नंतर विकासाला, सहकार्याला गती मिळाली ती माध्यमिक शाळेच्या शुभारंभातून. ही सारी कहाणी आहे सन २००५-०७ पासूनची. आज सहा वर्षांनी काही प्रमाणात वाकोद विकासाच्या योग्य वाटेवर असल्याचे चित्र दिसत आहे. तेथे काँक्रिटचे रस्ते, सौर पथदिवे, पाण्याची टाकी, संस्कार केंद्र, सुंदर शाळा अशी विकासकामे दिसू लागली आहेत.

गावाच्या विकासाविषयी मोठ्या भाऊंच्या मनांत असलेली कल्पना अगदी सुस्पष्ट आहे. ते म्हणतात, 'या गावात माझ्या कुटुंबाला येऊन किमान १०० वर्षे झाली. या मातीचे, जन्मभूमीचे माझ्यावर निश्चित ऋण आहे. माणसाने जाण्यापूर्वी जे ऋण फेडायचे असते, त्यात मातृभूमीचे ऋण आहे. कृतज्ञता हा मूळ गुण आहे. त्यामधून इतर गुणांचा जन्म होतो. ज्याच्या अंगी कृतज्ञता आहे, त्याला कर्तव्याची जाणीव होते. कर्तव्याची जाणीव ज्याच्यात आली त्याच्यात आदर नम्रभाव निर्माण होतो. म्हणूनच माझ्या जन्मभूमीत मी काही तरी करावे अशी माझी हृदयापासून इच्छा आहे.

मोठ्या भाऊंनी हे शब्द प्रत्यक्ष



वोकोदमधील ग्रामसभेत बोलताना भवरलाल जैन.

कृतीत आणले आहेत. सामाजिक ऋणाच्या उतराईसाठी मोठ्या भाऊंनी जैन उद्योगसमूहाच्या माध्यमातून जैन चॅरिटीज् या संस्थेची स्थापना केली. त्याच माध्यमातून वाकोदच्या विकासाचा आराखडा हळूहळू आकार घेऊ लागला. या उपक्रमात त्यांचे पक्के सोबती ठरले ते कविवर्य ना. धों. महानोर. वाकोदपासून अवघ्या हाकेच्या अंतरावर महानोर यांचे पसळखेड (जि. औरंगाबाद) हे गाव आहे. या दोघांनी आपापल्या जन्मभूमीच्या विकासाचे स्वप्न आपल्याच मातीतून पाहिले.

गेल्या सहा वर्षांत गावाच्या विकासासाठी सोबत आलेल्या काही मंडळींनी विश्वासात घेऊन गावाच्या प्रगतीचा एक-एक टप्पा त्यांनी पार करणे सुरू केले आहे. गावाचा विकास स्वत:च्या नजरेतून करायचा; तर त्यासाठी व्यवस्थापन यंत्रणा स्वत:ची हवी. म्हणून जैन चॅरिटीज्च्या माध्यमातून स्वतंत्र कार्यालयीन व्यवस्था तयार केली. सहायक व्यवस्थापक, दोन सिव्हिल इंजिनिअर, सिव्हिल सुपरवायझर, ग्रामविकास समन्वयक, सामाजिक कार्यकर्ता आणि शैक्षणिक समन्वयक अशी पदे निर्माण केली. अर्थात, या व्यवस्थापनाचा अनुभव हा उद्योगातलाच. २००४ पासून ही यंत्रणा वाकोदच्या विकासाचे विविध प्रकल्प पूर्ण करीत आहे. या यंत्रणेच्या माध्यमातून वाकोदमध्ये आतापर्यंत ३ कोटी २२ लाख ३० हजार ७७३ रुपयांची कामे झाली आहेत. यातील व्यवस्थापन यंत्रणेवरचा खर्च आहे; अवघा ३२ लाख १६ हजार ७४८ रुपये. एकूण खर्चाच्या केवळ १० टक्के.

गावच्या विकासावर खर्च झालेल्या ३ कोटी २२ लाख रुपयांत जैन चॅरिटीज्चा हिस्सा आहे २ कोटी २२ लाख ३० हजार ७७३ रुपयांचा. एकूण रकमेच्या ७० टक्के (६९.०२). यात गावाने लोकवर्गणीतून योगदान दिले आहे, १.१२ टक्के म्हणजे ३ लाख ६१ हजार २८८ रुपये. शासकीय निधी मिळालेला आहे, २९.३३ टक्के म्हणजे ९४ लाख ४९ हजार ४०० रुपये. शाळेच्या बांधकामात तेथील स्थानिक शिक्षण संस्थेने केवळ १ लाख ६८ हजार रुपये (.५९ टक्के) निधी दिला आहे. प्रत्यक्षात शाळेच्या कामांवर ४६ लाख ४९ हजार २४१ रुपये खर्च झाले आहेत. ही सारी आकडेवारी मोठ्या भाऊंच्या नेतृत्वाखालील पंचवार्षिक योजनेची आहे.

गेल्या पाच वर्षांत वाकोदमध्ये काय काय झाले, याचा मागोवा घेतला; तर मोठ्या भाऊंच्या दूरदृष्टीची कल्पना येते. येथे बाजारासाठी व्यापारी ओटे, सौरपथदिवे, समाजमंदिर, रस्ते, गटारी, शौचालय ही कामे झाली. त्यावर १ कोटी ५८ लाख ५९ हजार ९६७ रुपयांचा खर्च झाला आहे. यात जैन चॅरिटीज्चा हिस्सा आहे १ कोटी १० लाख ९९ हजार ६४६ रुपयांचा. माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळाविकासाची ४६ लाख ४९ हजार २४१ रुपयांची कामे झाली आहेत. त्यात जैन चॅरिटीज्ने ४४ लाख ८१ हजार २४१ रुपये खर्च केले आहेत. शेती व शेतकऱ्यांच्या विकासावरील एकूण खर्च आहे, १० लाख ६३ हजार २३५ रुपये. हा सर्व खर्च जैन चॅरिटीज्ने केला आहे. प्राथमिक आरोग्य केंद्राच्या उभारणीवर एकूण खर्च झाला आहे. ४४ लाख ५८ हजार ९५१ रुपये. त्यात जैन चॅरिटीज्चे योगदान आहे ७ लाख ३७२ रुपये. या पद्धतीने गावात आध्यात्मिक व सांस्कृतिक विकास केंद्र, अंगणवाडी, उर्दू-मराठी शाळांचा विकास झालेला आहे.

मोठ्या भाऊंनी केवळ पदरच्या पैशातच कामे केलेली नाहीत. ग्रामपंचायतीच्या पदाधिकारी व ग्रामसेवकांना मार्गदर्शन करून शासनाकडूनही निधी मिळविला आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र, समाजमंदिर, रस्तेबांधकाम, वस्तिशाळेसाठी व मराठी

शाळाखोली बांधकामासाठी असा ४० लाख २६ हजार रुपये निधी मिळविला आहे. गावाच्या सोबत ग्रामपंचायत व तेथील प्रशासन बळकट करण्याकडे लक्ष देण्यात आले आहे. आपली गाव विकासाची भूमिका पदाधिकाऱ्यांना आणि ग्रामस्थांना कळावी म्हणून मोठ्या भाऊंनी वारंवार ग्रामसभा घेतल्या आहेत. याचाच परिणाम म्हणून सन २००५ ची निवडणूक मोठ्या भाऊंच्या एका शब्दावर बिनविरोध झाली होती. त्या नंतर या वर्षी (२०१०) तसाच प्रयत्न करण्याचा मोठ्या भाऊंचा विचार होता. तो काहीअंशी नाकारला गेला. ग्रामपंचायतीचे संगणकीकरण करण्यात आले आहे.

या ग्रामपंचायतीचे वार्षिक उत्पन्न सरासरी ३ लाख ५० हजार ते चार लाख होते. मोठ्या भाऊंनी वारंवार ग्रामस्थांशी संवाद साधून वसुलीच्या कामात सहकार्याचे आवाहन केले. गावातील सार्वजनिक कार्यात माझाही एक रुपया खर्ची पडावा हा विचार लोकांच्या मनांत रुजवला. त्याचा सकारात्मक परिणाम झाला. गावातील करांची वसुली आता ५ लाख ८९ हजार रुपयांवर गेली आहे. गंमत म्हणजे सन २००४ ते २००९ दरम्यान ग्रामपंचायतीत पूर्णवेळ ग्रामसेवक नव्हते; तरीसुद्धा ग्रामस्थांनी वसुलीसाठी सहकार्य केले.

विकास योजनांच्या पलीकडे जाऊन जैन चॅरिटीज्‌ने वाकोदमध्ये कामे केली आहेत. उन्हाळ्यात पाणपोई सुरू करणे, जैन स्थानकाची दुरुस्ती, ट्री गार्ड लावणे, बाजार ओटे बांधणे, अतिक्रमण हटवणे व पुनर्वसन निर्मलग्राम प्रशिक्षण देणे, राम मंदिर जीर्णोद्धार, गौराई घाट बांधणे, वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्थसाह्य करणे, व्यापारी गाळे बांधकाम अशी अनेक कामे जैन चॅरिटज्‌ने केली आहेत.

गावातील धार्मिक सलोखा राखण्यासाठी वेगळ्या प्रकारे नियोजन करण्यात आले आहे. आध्यात्मिक व सांस्कृतिक विकास योजनेत सर्व धर्मीयांना मदत करण्यात आली आहे. शिबिरे घेणे, शिवजयंती, अण्णा भाऊ साठे जयंती, इफ्तार पार्टी, क्रीडा स्पर्धा घेणे, एक गाव : एक गणपती योजना राबविणे, गोवंश हत्याबंदी उपक्रम, प्रजापिता ब्रह्माकुमारी केंद्रासाठी जागा विकत घेऊन देणे, अशा अनेक कामे करण्यात आली आहेत. यावर प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे ५ लाख १७ हजार रुपये खर्च झाला आहे. यांशिवाय आरोग्य, शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांकवरील खर्चही वेगळा करण्यात आला आहे.

केवळ पैसा देणे या पुरतीच जैन चॅरिटीज्‌ची जबाबदारी नाही. गावकऱ्यांचे प्रबोधन, प्रशिक्षण आणि सार्वजनिक वस्तूंचे संरक्षण व दुरुस्ती असा संस्कार करण्याकडेही मोठ्या भाऊंनी लक्ष दिले आहे. त्यामुळे वाकोदमध्ये सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करण्याची सामूहिक जबाबदारी ग्रामस्थ पाळू लागले आहेत. ही बाब सरकारी यंत्रणेच्या माध्यमातून कोणालाही आजपर्यंत शक्य झालेली नाही. मोठ्या भाऊंच्या नियोजनाची दूरदृष्टी या संस्कारातून दिसते. म्हणूनच भवरलाल जैन जन्मभूमीचे ऋण फेडणारे एकमेवाद्वितीय उद्योगपती ठरतात. त्यांच्या या कार्याचे अनुकरण करण्याची प्रेरणा इतरांना निश्चित होऊ शकेल.

**(लेखक हे दै. 'देशदूत'च्या नाशिक आवृत्तीचे वृत्तसंपादक आहेत.)**

■■